महाराष्ट्र शासन
जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय जळगाव
महाबळ रोड, जळगाव ४२५००२

TelePhone:-0257-2262808
Dr.S .J.Gaikwad-9822318248
E Mail :- ddcahjalgaon@gmail.com

प्रति,

जिल्हाधिकारी,
जळगांव.

विषयः-जळगांव जिल्हयात सार्वजनिक भागिदारी तत्वावर सधन कुक्कुट गट स्थापन करणेसाठी अर्ज भरणेबाबत....

संदर्भ :-१)शासन निर्णय क्र. कुक्कुट-२०१७/प्र.क्र.६७/पदुम-४,मुंबई-३२ दिनांक-१३/११/२०१७.
२)मा.आयुक्त पशुसंवर्धन,म.रा.औंध पुणे यांचेकडील पत्र क्र.कुक्कुट-२/५४२८/पीपीपी मॉडेल/२०१७ पसं-१३ पुणे-६७ दिनांक- २३/११/२०१७.

जा.क्र.जिपउआ/तांत्रिक/स.कु.गट/३६३१-३४ /२०१७, जळगांव , दिनांक :- ७/११/२०१७.

उपरोक्त विषय व संदर्भाचे अनुषंगाने नमूद करण्यांत येते की,शासन निर्णय व पशुसंवर्धन खात्याचे मार्गदर्शक सूंचनेनुसार जळगांव जिल्हयात सन २०१८-१९ पासून टप्प्या टप्प्याने दर वर्षी सार्वजनिक भागिदारी तत्वावर सधन कुक्कुट गट स्थापन करणेसाठी अर्ज मागविण्यात येत आहे. या योजनेचा लाभ घेणेसाठी लाभार्थीकडे कुक्कुट पालनाचा व्यवसाय स्वतःच्या मालकीच्या २५०० चौ.फुट जागा दळणवळणाची, विद्युत व पाण्याची सोय तसेच हॅचर सेंटर असलेल्यांना प्राधान्य दिले जाईल. अशा पात्र व ईच्छूक लाभार्थ्यांनी शासन निर्णय व खात्याचे मार्गदर्शक सुचनेनुसार तालुकास्तरीय पशुधन विकास अधिकारी (विस्तार)पंचायत समिती- यांनी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,जिल्हा परिषद यांचेमार्फत जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त या कार्यालयाकडे विहित नमुन्यात व परिपूर्ण कागदपत्रांसह दि.३०/१२/२०१८पर्यत अर्ज सादर करावेत, त्यानंतर येणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. सदरील लाभार्थीची निवड जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीमार्फत होईल.

शासन निर्णय व मार्गदर्शक सुंचना महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर व पशुधन विकास अधिकारी विस्तार यांचेकडे पहावयास मिळेल.(**www.maharashtra.gov.in**)संकेतांक क्र.२०१७१११३१२२२१४३८८०१.

खालील वर्षानुसार सन २०१८-२०१९-४ तालुके, सन २०१९-२०-४ तालुके, सन २०२०-२१-५ तालुके याप्रमाणे दर वर्षी प्रती तालुका १ लाभधारक निवडला जाईल.

सन २०१८-२०१९- ४ तालुके,- नांवे- अंमळनेर, भुसावळ,भडगांव,बोदवड --प्रती तालुका १ लाभार्थी
.सन २०१९-२०२०- ४ तालुके- नांवे:- चाळीसगांव,एंरडोल,धरणगांव,जळगांव-प्रती तालुका १ लाभार्थी
सन २०२०-२०२१- ५ तालुके –नांवे :- जामनेर,मुक्ताईनगर,पारोळा,रावेर,यावल-प्रती तालुका १ लाभार्थी

वरीलप्रमाणे शासनाची योजनेची माहिती कृपया जळगांव संकेतस्थळावर (एन.आय.सी.पोर्टल)वर प्रसिध्द करण्यात यावे, हि विनंती.

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,
जळगांव.

प्रतिलिपी- माहितीसाठी सादर,
१)मा.जिल्हाधिकारी, जळगांव,
२)मा.आयुक्त पशुसंवर्धन,महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-६७.
३)मा.प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, नाशिक विभाग, नाशिक-२.